**कि.फौ.अर्ज :- १३२/२०१७**
**रिता/रमेश**

**<u>नि.क.१२ प्रमाणे शपथेवर पुढील सरतपास सुरू:-</u>**
**<u>अर्जदारातर्फे श्री. पी.टी. गजवे वकील साहेब-</u>**

१. मी साक्षीपुराव्यासाठी शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. तो मला वाचून व समजावून सांगीतले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. शपथपत्र नि.क्र. १२ वर आहे.

२. मला माझ्या लग्नामध्ये मिळालेल्या सामानाची यादी दाखल केली आहे. ती यादी माझा भाउ नरेश खंगारने तयार केली असुन ती नरेशच्या हस्ताक्षरात आहे. ती यादी आर्टीकल अ-१ वर आहे.

**<u>उलटतपास गैरअर्जदार कं. १,२,४ ते ७ साठी श्री. एस. के. मानकर वकील साहेब.</u>**

३. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. गैरअर्जदार कं. १ हा अशिक्षीत आहे. गैरअर्जदार कं. १ ला लिहीता-वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरचा अर्ज हा गैरअर्जदार कं. १ कडुन आंदनातील सामान, खावटी व घटस्फोट मिळावा या उददेशाने दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार कं. १ हा मला घटस्फोट देउ इच्छीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला गैरअर्जदार कं. १ सोबत नांदावयाचे नाही.

४. मला गैरअर्जदार कं. १ पासुन प्रियांशु नावाचा मुलगा झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रियांशु हा ६ महीन्याचा असतांना मी त्यास सासरी सोडुन माहेरी निघुन गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०५.२०१६ रोजी मी कुणालाही न सांगता सासरच्या घरून निघुन गेली होती. हे

DISTRICT COURT, NAGPUR

म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गैरअर्जदार क्रं. १ ने माझी शोधाशोध केली परंतु मी मिळुन आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०५.२०१६ रोजी मी बेपत्ता असल्याबाबत गैरअर्जदार क्रं. १ ने नंदनवन पोलिस ठाणे नागपुर येथे तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७. ०५.२०१६ रोजी मी जेव्हा सासर वरून निघुन गेली होती ही बाब माझया आईला माहीती होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.०५.२०१६ रोजी माझया आईने गैरअर्जदार क्रं. १ व त्याच्या नातेवाईकाविरूद्व पोलिस अधिक्षक नागपुर यांच्याकडे खोटी तक्रार दाखल केली होती.

५. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २३.१२.२०१७ रोजी माझा मुलगा प्रियांशु हा गैरअर्जदार क्रं. १ यांच्याकडे मयत झाला. हे म्हणणे खरे आहे की, प्रियांशु हा जन्मापासुनच अपंग होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रियांशुला जेवण व औषध पाणी दुस-याला करावे लागायचे. माझा मुलगा हा मयत झाला त्यावेळी ३ वर्षाचा होता. ज्यावेळी माझा मुलगा प्रियांशु मयत झाला त्यावेळी मी माझया माहेरी होती. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा प्रियांशु ६ महीन्याचा असतापासुन ते मयत होईपर्यंत त्याची काळजी गैरअर्जदार क्रं. १ घ ेत होता.

६. मला शिवणकाम येत नाही. मी ज्यावेळी गैरअर्जदार क्रं. १ सोबत राहत होती त्यावेळी आमच्या सोबत गैरअर्जदार क्रं. १ चे आई वडील राहत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्यावेळी सासरी होती त्यावेळी आमच्या सोबत गैरअर्जदार क्रं. १ चे आई वडील राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्रं. १ हा त्याच्या आई वडीलांचा सांभाळ करीत होता. साक्षीदार सांगते की, गैरअर्जदार क्रं. १ हा तिचाच सांभाळ करीत होता.

७. रमेशने मला उशी तोंडला लावुन मारण्याचा प्रयत्न केला या

DISTRICT COURT NAGPUR

बाबत मी पोलिसांत तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घ ाटना घडलीच नव्हती म्हणुन मी पोलिसांत तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्रं. १ चे गिताबाई सोबत अनैतिक संबंध आहेत हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्रं. १ सोबत नांदावयाचे नसल्यामुळे त्याचे गिताबाई सोबत अनैतिक संबंध आहेत अशी मी खोटी अफवा केली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्रं. १ हा मला गिताबाईच्या सांगण्यावरून मारहान करीत होता हे मी खोटी सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार सत्यफुला, रवि यांनी माझया भावाला मारहान केली हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्रं. १ कडुन घटस्फोट मिळावा यामुळे मी गैरअर्जदार क्रं. २ ते ७ यांना अर्जात सामील केले. हे म्हणणे खरे आहे की, मी नागपुर येथे गैरअर्जदार क्रं १ च्या विरोधात घटस्फोटाकरीता अर्ज दाखल केला आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी शारीरिक दृष्टया सक्षम आहे व मला कोणताही आजार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझया स्वत:चे भरणपोषन स्वत: करू शकते. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्रं. १ हा शेतमजुरीचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्रं. १ ला त्याच्या आई वडीलांचा सांभाळ करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रामध्ये खोटे आरोप लावले आहेत व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,,
पारशिवनी.

दिंनाक :-२५/१०/२०१८.

DISTRICT COURT NAGPUR